# गणपति कालचा आणि आजचा

लेखक - डॉ. चन्द्रकान्त गर्जे

'गणपति' या देवतेबद्दल आजपर्यन्त बरेच काही लिहिले गेले आहे, सध्याही लिहिले जात आहे व भविष्यातही लिहिले जाणार आहे. कारण गणपतिचा महिमा काही औरच आहे. या लेखाच्या माध्यमातून 'गणपति' या देवतेचे निराळे नि खरे सन्दर्भ व अर्थ पाहण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तसेच वर्त्तमान काळात कोणत्या सन्दर्भाने गणपतिची पूजा मांडली जाते? याची जाणीव करून देण्याचा प्रयत्न ही केला आहे. हे या लेखाच्या शीर्षकावरून स्पष्ट होते.

ऋग्वेदात गणपतिचे वर्णन खालीलप्रमाणे येते -

**ओ३म् गणानान्त्वा गणपतिं हवामहे कविं कवीनामुपमश्रवस्तमम् ।**
**ज्येष्ठराजं ब्रह्मणां ब्रह्मणस्पत आ नः शृण्वन्नूतिभिः सीद् सादनम् ॥ - [ऋग्वेद २।२३।१]**

या मन्त्राची देवता ब्रह्मणस्पति आहे. याचा अर्थ आहे की या मन्त्रात प्रतिपाद्य विषय ब्रह्मणस्पति आहे. ब्रह्म शब्दाचे अर्थ परमेश्वर, ब्रह्माण्डनायक, सूर्य, धन, अन्न, मन, प्राण, वाक्, वेद, यज्ञ, ब्राह्मण, सर्वात मोठा इत्यादि आहेत. ज्यांस चारही वेदांचे ज्ञान आहे, अशा विद्वानास ब्रह्मा म्हणतात. यज्ञकार्यातही एका पुरोहिताची/ऋत्विजाची संज्ञा ब्रह्मा अशी असते. ब्रह्मणस्पति म्हणजे ब्रह्माचा पति - ब्रह्माण्डपति, वेद, यज्ञ, अन्न, धन इत्यादिंच्या स्वामीला ब्रह्मणस्पति म्हणतात. आध्यात्मिक अर्थ 'परमेश्वर' होतो. या मन्त्रात परमेश्वरासाठी गणांचा स्वामी गणपति, कविंचाही कवि, ज्येष्ठराज आदि विशेषणे आली आहेत. गण म्हणतात गणनीय - मोजमाप होणार्या वस्तुंना! मुख्य किंवा श्रेष्ठ वस्तुंना गण म्हणतात. यावरून गणपतिचा अर्थ होतो 'प्रजापति'. सर्व ब्रह्माण्डाचा स्वामी कविंचाही कवि आहे.

'गणपति' या शब्दातील 'गण' हा शब्द समुह किंवा समाजवाचक आहे. समाजात एक प्रमुख व्यक्ति असतो. 'प्रमुख' या नात्याने तो समाजाला संभाळीत असतो, समाजाचे रक्षण करीत असतो. या अर्थाने समाज रक्षक हा गणपति होय. 'पति' शब्दाचा अर्थ रक्षण करणारा - 'पाति इति पतिः'। भारतीय परम्परेत गणपतिचे महात्म्य थोर असे आहे. प्रत्येक कार्याचा प्रारम्भ गणपति वन्दनेने केला जातो. "गणानान्त्वा गणपतिं हवामहे" चा उच्चार करीत, (भक्त) व्यक्ति हाती घेतलेल्या कार्याची सुरुवात करीत असते. प्रत्येक शुभ कार्यारम्भापूर्वी गणेश स्तवन, पूजन केले जाते. वास्तविकपणे पाहता ही उपासना परमेश्वराची करावयाची आहे किंवा यज्ञकर्माद्वारे करायची असते. कारण गणपतिचा अर्थ परमेश्वर आणि यज्ञ आहे. 'गणपति' शब्द तसा सरळ ही आहे. शास्त्रोक्त ही आहे. गणपति हा देवगणांचा पति म्हणजेच पालक आहे, रक्षण करणारा आहे. रक्षकामध्ये खूप बळ असावे लागते. तरच तो

रक्षण करू शकतो. ज्यात रक्षण करण्याचे बळ नाही, तो पति होऊ शकत नाही. या संदर्भ व अर्थान्वये गणपति आलंकारिक शब्दाने दैवत कल्पून आपली अपरिमित श्रद्धा अर्पण केली आहे. या श्रद्धा भावनेत संघटीत समाजाची संकल्पना दिसून येते. गणपति हे समाज व्यवस्थेचे प्रतिक होय.

पौराणिक 'गणपति' म्हंटल्यानंतर गणपतिची लांब अशी सोंड, त्याचे दात, छोटे-छोटे किलबिले डोळे, सूपाच्या आकृतीचे दोन कान, मोठे पोट, वस्त्ररहित उघडे वक्षस्थळ, चार हात, प्रत्येक हातात एक-एक पदार्थ, शिवाय त्याच्या शेजारी एक उंदीर अशी ही त्याची प्रतिमा आपल्या डोळ्यापुढे उभी राहते.

गणपति हा समाजाचा केवल रक्षकच नसून नेता ही आहे. 'नयतीति नेता' अर्थात् समाज, देशाला प्रगतीच्या दिशेकडे वाटचाल करविणारा म्हणजे नेता. अश्या या नेत्याची बहुरूपे गणपतिच्या प्रतिमेत दिसून येतात. समाज-देशाचा नेता कसा असावा? याचे उत्तर गणपतिच्या प्रतिमेत दडलेले आहे. ज्याचे नाक (सोंड) लांब असावे, ज्यामुळे त्यांचे तोंड दिसत नाही, कारण लांब नाकाच्या आड तोंड आहे. त्याचा मतितार्थ असा आहे - 'स्वतःची स्तुति स्वतः न करणारा.' खरा नेता स्वस्तुति कधीच करीत नसतो. नेता कमी बोलणारा असावा, पण खूप असे ऐकणारा असावा. सूपा एवढे कान हे लोकांचे म्हणणे ऐकणारा नेता, असे दर्शवितात. नेत्याने लोकांची प्रत्येक बाब ऐकली पाहिजे. जनतेचे ऐकून ते या कानातून त्या कानाच्या मार्गे न सोडता ते पोटात सामावून घेतले पाहिजे व वेळोवेळी मुखाद्वारे प्रकट ही केले पाहिजे, हेच गणपतिचे विशाल पोट दर्शविते. वेळप्रसंगी लोकांची तक्रार ऐकण्याची सवय लावून घेतली पाहिजे. म्हणून त्याची मुखाकृति निस्पृह असावी. ती चिंतातूर नसावी. गणपतिचे 'एकदन्तपण' दृढ भावनेला दर्शविणारे आहे. नेता दृढ भावनेचा असावा व तो दृढ प्रतिज्ञेचा असावा. गणपतिचे छोटे डोळे, अफाट निरीक्षण शक्तीचे द्योतक आहेत. नेत्यांना डोळे उगारून चालणार नाही. तो विवेक बुद्धिने पाहणारा ही असावा. उंदीर तसा चंचल प्राणी. या बिळातून त्या बिळात धावणारा. सतत धावणारा विराट गणपतिच्या शेजारी, सातत्याने राहणारे त्याचे वाहन, म्हणजे उंदीर. हे शक्य आहे काय? जुन्या काळात राजा आपल्या प्रजेची सुख-दुःखे जाणून घेण्यासाठी, वेष पालटून, रात्री-अपरात्री फेरफटका मारीत असे. प्रजेला जाणून घेण्याचा प्रयत्न करीत असे. गणपतिचा उंदीर या कार्याचेच प्रतिक होय. छद्मवेषात सुरुंगातून ही मार्ग काढीत, शत्रुराज्यात प्रवेश करून टेहळणी करावी, आद्योपान्त माहिती मिळवावी हे गणपतिचा उंदराचे कार्य होय. अर्थात् उंदीर म्हणजे राजाचे गुप्तहेर खाते. अर्थात् सी. आय. डी. विभाग. उंदीराचे कार्य हे सी. आय. डी. विभागाचे कार्य.

राजा-नेता मनोरंजनातच गुंतलेला नसावा. तो राज्य रक्षक असावा. वेद म्हणतात –

**'यत्त ऊनं तत्त आ पूरयाति प्रजापतिः प्रथमजा ऋतस्य' - [ अथर्ववेद १२ । १ । १ । ६१ ]**

नेता वा राजाच्या धोरणासम्बन्धी धडे देणारे 'गणपति' हे रूपक होय. गणपतिचे हे चार हात समाज, देशाच्या सामर्थ्याचे व मतत्त्वपूर्ण कार्याचे द्योतक होय. हे त्याच्या चतुरंग सेनेचे अर्थ दर्शविणारे आहे. गणपतिच्या चार हातात वेगवेगळ्या अर्थपूर्ण वस्तु आहेत. गणपतिचा उजवा हात आशीर्वाद देणारा आहे. शिवाय ते शान्तीचे द्योतक ही आहे. डाव्या हातात मोदकाचे पात्र आहे. ते प्रलोभन देऊन वशीभूत करणारे मोदकाचे पात्र होय. वरच्या हातात परशू शस्त्र आहे. ते शत्रूला नमविणारे शस्त्र आहे. चौथ्या हातात कमळाचे फूल आहे. ते पावित्र्याचे प्रतिक होय. आपल्या प्रतिमेत वैविध्य धारण केलेला 'गणपति' नेता आहे. गणपतिचे मोठे पोट समृद्धि दर्शविणारे आहे. हे वैश्य (शेतकरी, व्यापारी आदि) राष्ट्राचे पोट होय. ऐश्वर्य, समृद्धिची खाणच दर्शविणारे पोट आहे. गणपतिचे उघडे वक्षस्थळ शक्तीचे द्योतक आहे. नेत्याचे वक्षस्थळ शत्रूला नमविणारे असावे. हा त्याचा मूळ अर्थ. पैलवान कपडे धारण करून कुस्ती लडत नसतो. तो लंगोटधारी असतो व संपूर्ण सामर्थ्याने आखाड्यात उतरतो. प्रतिद्वन्दीची पाठ भूईसपाट करण्याच्या प्रयत्नात असतो. वीर, पराक्रमी तोच आहे, जो निधड्या छातीचा असतो. निधडी छातीच शत्रूला सामोरी जाऊ शकते. आपल्या निधड्या छातीचे तुकडे झालेले चालतील, पण तोंड लपवून पळपुटा राजा नको. अशा विविध गण प्रतिकांचा देवता म्हणजे गणपति. गणपतिच्या प्रतिमेत दडलेला गूढ अर्थ - जुन्या काळात प्रतिमेच्या पूजनाचा अर्थ होता, गणपतिमध्ये दडलेल्या गुणांची पूजा. गुणांची पूजा म्हणाजे गुण धारणा करण्याची प्रक्रिया. हे आपले जुने दैवत 'गणपति'. (गणपतिच्या गुणांना धारण करणे म्हणजेच गणपति देवताचे पूजन.)

आता वळू या आजच्या गणपतिकडे! नवजागरणाच्या, काळात लोकमान्य टिळकांनी जनमाणसात स्वातन्त्र्याची ज्योत पेटविण्यासाठी गणपति देवताची प्रेरणा मिळावी, या श्रद्धेने 'गणेश उत्सवाची' सुरुवात केली. काळाच्या प्रवाहात गणपति उत्सवाचे मूळ स्वरूप बदलून नवीन गणपतिचा अवतार होईल याची कल्पना लोकमान्य टिळकांनी केली. दहा दिवसांचा गणपति उत्सव, गणपतिच्या कोणत्या मतितार्थाला धरून आहे? असा सवाल विचारवंतांच्या डोक्यात डोकावतो आहे. मला माझ्या पन्नास-साठ वर्षांपूर्वीचे दिवस आठवतात. आमच्याही बालपणी गणपति उत्सव साजरा केला जात असे. गणपतिच्या प्रतिमेचे वाजत-गाजत, भक्तिभाव, भजनाच्या ओवी आळवीत प्रतिमेची प्रतिष्ठापना केली जात असे. ते दहा दिवस नवसाचे आणि नैवेद्याचे नसून वैविध्याने भरलेले असायचे. बालकांना सन्धी असायची आपल्या विविध गुण प्रदर्शनाची. कधी वाद-विवाद स्पर्धा, तर कधी गायन स्पर्धा, कधी नाट्याभिनय प्रदर्शन तर कधी भक्तिभाव कीर्तनाचा सोहळा, मोह पाडणारी अभांगवाणी, विद्वानांची विद्वत्प्रचुर व्याख्याने अशी मेजवाणी गणपतिपुढील मंचावरून मिळायची. गणपति उत्सवाचे ते दिवस आता राहिले नाहीत.

आज निरनिराळ्या ठिकाणच्या कारखान्यातून माती-चिखलाची, प्लास्टर ऑफ पॅरीस, कुठे-कुठे काष्ठातून साकारलेले तर कुठे सोन्या-चान्दीच्या गणपतिचा वावर दिसून येतो. गल्लोगल्लीचा गणपति, कुठे संस्थानिकांच्या नावे, कुठे संस्थांच्या नावे, पुढार्‍यांच्या नावे, धर्माच्या नावे, व्यक्तिंच्या नावे अशी वेगवेगली नावे मिरवीत कुठे उभा आहे तर कुठे मांडी घालून बसलेला गणपति आहे. आजचा गणपति आपली रूपे बदलतो. वस्त्र बदलतो, आसन बदलतो. त्याच्या अवती-भोवती नाना प्रसंगांचे वातावरण, डोळे किलकिले करून तो फक्त पाहत असतो. दहा दिवसांचा आजचा गणपति गणपतिचा मंच नसून सिनेसृष्टिचा रंगमंचच होय. त्या रंगमंचावर कानठळ्या बसणार्‍या ऑर्केस्ट्राचा वाद्यवृन्द. ऑर्केस्ट्राच्या तालावर आचकट-विचकट डान्स, फिल्मी दुनियेतील रिमिक्स गाणी आणि डोळे दीपविणारा वीजेचा लपंडाव हे सर्व काही पाहत गणपति नुसता उभा आहे. बसला आहे. तो ही दहा रात्री आणि दिवस? गणपति उत्सवाचा खर्च अफाट असो, विद्युत रोषणाईचा झगमाट किती व कसाही असो, याकडे दुर्लक्ष करू या. पण गणपतिच्या अर्थाचा मूल गाभा आपण एका क्षणात विसरलो आहोत. आपण गणपति विसर्जनासाठी गुलाल उधळतो, रंगात माखून जातो. गणपति विसर्जनाचा हा रंग होळीच्या रंगाला लाजवेल असा असतो. कुठे-कुठे या रंगात उग्र वास ही मिसळालेला असतो. आपण गणपति विसर्जनासाठी ३०-३५ तास घालवितो पण गणपति गुणांची पायमल्ली एका क्षणात करतो. हे आपण विसरून जातो. ध्वनी, वायु, जल प्रदूषणात आपण अखण्ड बुडून जातो. याचे आम्हाला भानच नसते.

मनुष्यकृत ह्या काल्पनिक मूर्तिद्वारे ईश्वराची कल्पना करून ह्या जड प्रतिमेचे पूजन करणे हे सत्यज्ञानाच्या पूर्णतः विरुद्ध आहे. म्हणून हा केवल अंधश्रद्धेचा भाग आहे. वास्तविकपणे गणपतिची पूजा-अर्चा, स्तवनादि करणे म्हणजे परमेश्वराची उपासना करणेच आहे. आणि ही उपासना म्हणजे त्यांच्या आदेशांचे पालन करणे होय. अग्निगुणसंपन्न विद्वान ब्राह्मणांचा-क्षत्रियांचा आदर करणे, त्यांच्या हाती राष्ट्राची धुरा सोपविणे, त्याच लोकांना राष्ट्राचे कर्णधार निवडणे, यज्ञ करणे आणि वेदाध्ययन-वेदाध्यापन करणे आदि गोष्टी ज्या दिवशी आपले हिन्दु बान्धव समजून घेतील, गणपति आणि त्याच्या पूजेचे हे असे रहस्य समजून घेतील, त्याप्रमाणे आचरण व कर्म करतील, त्याक्षणापासून आमच्या राष्ट्रात ऋद्धि-सिद्धि प्रतिष्ठापीत होईल, आमची पापे किंवा दोष नष्ट होतील. (ब्राह्मण जन्माने नव्हे, तर गुण-कर्म्म-स्वभावाने होतात - इति वेद-मनुस्मृति-गीता)

आज खरी गरज आहे - गणपति या नेत्याला, मंगलमूर्तिला खर्‍या अर्थाने जाणून घेण्याची. त्याला जाणून घेऊन त्याची खरी पूजा केली तर आपले जीवन, समाजाचे-देशाचे जीवन मंगलमय होईल. यात काही शंका नाही.

-११, भोसले ईलायट,

भोसले नगर, शिवाजीनगर, पुणे.

**'गणेश'** और **'गणपति'** शब्द की सिद्धिः -

[ श्रीमद्दयानन्दसरस्वतीस्वामिकृत सत्यार्थप्रकाश के प्रथम समुल्लास से ]

(**गण संख्याने**) इस धातु से **'गण'** शब्द सिद्ध होता है, इसके आगे **'ईश'** वा **'पति'** शब्द रखने से **'गणेश'** और **'गणपति'** शब्द सिद्ध होते हैं। **'ये प्रकृत्यादयो जडा जीवाश्च गण्यन्ते संख्यायन्ते तेषामीशः स्वामी पतिः पालको वा'** जो प्रकृत्यादि जड और सब जीव प्रख्यात पदार्थों का स्वामी वा पालन करनेहारा है, इससे ईश्वर का नाम **'गणेश'** वा **'गणपति'** है।

---

[ श्रीमद्दयानन्दसरस्वतीस्वामिकृत ऋग्वेद भाष्य से ]

**ओ३म् गणानान्त्वा गणपतिं हवामहे कविं कवीनामुपमश्रवस्तमम् ।**
**ज्येष्ठराजं ब्रह्मणां ब्रह्मणस्पत आ नः शृण्वन्नूतिभिः सीद् सादनम् ॥ - [ऋग्वेद २।२३।१]**

**पदार्थः -** हे (**ब्रह्मणाम्**) बडे बडे धनों में (**ब्रह्मणस्पते**) धन के स्वामी हम लोग (**गणानाम्**) गणनीय मुख्य पदार्थों में (**गणपतिम्**) मुख्य पदार्थों के स्वामी (**कवीनाम्**) उत्तम बुद्धिवालों में (**कविम्**) सर्वज्ञ और (**उपमश्रवस्तमम्**) उपमा जिससे दी जाती ऐसे अत्यन्त श्रवणरूप (**ज्येष्ठराजम्**) ज्येष्ठ अर्थात् अत्यन्त प्रशंसित पदार्थों में प्रकाशमान (**त्वा**) आप परमेश्वर को (**आ, हवामहे**) अच्छे प्रकार स्वीकार करते हैं, आप (**ऊतिभिः**) रक्षाओं से (**शृण्वन्**) सुनते हुए (**नः**) हम लोगों के (**सादनम्**) उस स्थान को कि जिसमें स्थिर होते हैं (**सीद**) स्थिर हूजिये॥

**भावार्थः -** हे मनुष्यो! जैसे हम लोग सबके अधिपति, सर्वज्ञ, सर्वराज, अन्तर्यामि परमेश्वर की उपासना करते हैं वैसे तुम भी उपासना करो॥

